MHKO110004182017

**नियमित दिवाणी दावा क्रमांक ५६/२०१७ मधील**

**निशाणी क्र. २४ वरील आदेश**

**( श्रीमती आक्कुबाई आप्पा नाईक विरुध्द श्री .बापू कृष्णा नाईक )**

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्रमांक २ सुखदेव कृष्णा नाईक यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचे कथन असे की, प्रतिवादी क्रमांक २ सुखदेव कृष्णा नाईक यांचा दिनांक १०/०५/२०१९ रोजी मृत्यू झालेला आहे. त्यांचे मृत्यूपश्चात त्यांना सुरेश सुखदेव नाईक-मुलगा, रमेश सुखदेव नाईक- मुलगा, शोभा महादेव पंढरे- मुलगी, भारती किरण शिरगावे- मुलगी असे कायदेशीर वारस आहेत. प्रतिवादी क्रमांक २ यांच्या पत्नी शांताबाई नाईक हे यापूर्वीच मयत झालेल्या आहेत . सबब वादीने उपरोक्त वारस अभिलेखावर घेणेबाबत विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादी क्रमांक १ ते ६ यांनी आपले म्हणणे सादर करुन योग्य ते आदेश करणेबाबत विनंती केली आहे. प्रस्तुतचा अर्ज हा मुदतीत नसल्यामुळे दिवाणी नियमावलीतील तरतूदींप्रमाणे प्रतिवादी क्रमांक २ च्या वारसांना माझ्या पूर्वाधिकारी यांनी नोटीस काढून त्यांचे म्हणणे मागवले होते . परंतू त्यांना विहीत वेळेत नोटीस मिळूनदेखिल त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले नाही . सबब प्रस्तुतचा अर्ज हा त्यांचे म्हणणेशिवाय चालविणेत आला.

**४.** अर्ज, म्हणणे व अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**५.** प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ४ अन्वये दाखल केलेला आहे. सदरहू नियमाप्रमाणे प्रतिवादीच्या मृत्यूपश्चात दावा चालविणेचा अधिकार अबाधित रहात असेल तर त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेणेची तरतूद आहे. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द अतिक्रमण दूर करुन मिळणेकरीता दाखल केला आहे. सबब दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्रमांक २ यांच्या मृत्यूपश्चातदेखिल दावा चालविणेचा हक्क व अधिकार अबाधित रहातो. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे . सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी क्रमांक २ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर येणे गरजेचे आहे. अर्जातील नमूद कायदेशीर प्रतिनिधी व्यतिरिक्त प्रतिवादी क्रमांक २ यास अन्य प्रतिनिधी असल्याबाबत कोणताही वाद सदयस्थितीत दिसून येत नाही. तसेच सदरचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी यांचे उपरोक्त कायदेशीर प्रतिनिधी यांना कोणतीही तोषीस लागत नाही. याउलट प्रकरण गुणवत्तेवर निकाली करणेसाठी प्रतिवादी क्रमांक २ चे कायदेशीर प्रतिनिधी असणे आवश्यक आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**- आ दे श -**

**१.** अर्ज निशाणी क्र. २४ मंजूर करण्यात येत आहे.

**२.** वादी यांनी अर्जात नमुद प्रतिवादी क्रमांक २ चे वारसाबाबत दाव्यात दुरुस्ती प्रस्तुत आदेशापासून १४ दिवसांचे आत करावी व दाव्याची दुरुस्ती प्रत दाखल करावी.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT

Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2022.11.21 11:53:43 +0530

ठिकाण – पेठवडगांव ( एस.डी.शिरसाट )

दिनांक - १९/११/२०२२ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

पेठवडगांव